*पाटबंधारे प्रकल्पाचा सांडवा व पृच्छ कालवा यामध्ये ज्यांच्या जमिनी घेतल्या आहेत अशा जमिन मालकांना प्रकल्पग्रस्त समजण्याबाबत.*

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२००३/६५७/प्र.क्र.३५०/र-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २३ ऑगस्ट, २००४.

*शासन निर्णय :--*

पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्यामध्ये तथा पृच्छ कालव्यामध्ये ज्या शेतक-यांच्या जमिनी गेलेल्या आहेत त्यांना प्रकल्पग्रस्त समजून सर्व फायदे देण्यात यावेत, ही मागणी शासनाचे विचाराधीन होती. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :--

ज्या खातेदारांची जमीन महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, (१९७६ / १९८६ / १९९९) लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्यामध्ये तथा पुच्छ कालव्यामध्ये संपादीत करण्यात आलेली आहे त्यापैकी खालील अटींची पूर्तता करणा-या खातेदारांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र व अन्य फायदे देण्यात येतील.

(एक) संपादनानंतर ज्या खातेदारांची उर्वरित लागवड योग्य धारण जमीन १ हेक्टरहून कमी झाली आहे किंवा

(दोन) जिची उर्वरित धारण जमीन अशा तुकडयामध्ये विभागली गेली आहे की, ते लागवडीच्या दृष्टीने फायदेशिर राहीलेले नाहीत किंवा

(तीन) जिची उर्वरित धारण जमीन लागवडीस अयोग्य ठरली आहे असे खातेदार.

सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( आशा रणदिवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान सचिव (महसूल),
प्रधान सचिव (वने),